# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

**परीपत्रक**

क्रमांक : १०/एनजीपी/पदविका/२०१४-१५/ २५२
दिनांक : 14 MAR 2014

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता प्राप्त पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये प्रवेश क्षमता वाढ/घट, नवीन अभ्यासक्रम, सेकंड शिफ्टबाबतच्या प्रस्तावांच्या सुनावणीबाबत...**

संदर्भ :-१) या संचालनालयाचे पत्र क्र. १०/एनजीपी/मान्यता/२०१४-१५/४४, दि. २१/१/२०१४.
२) या संचालनालयाचे पत्र क.१०/एनजीपी/मान्यता/२०१४/१०१, दि. ४/२/२०१४.
३) या संचालनालयाचे पत्र क.१०/एनजीपी/मान्यता/२०१४-१५/१३७, दि. १४/२/२०१४.

उपरोक्त विषयाबाबत या संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या **पदविका अभ्यासक्रमाच्या** संस्थांनी प्रवेश क्षमता वाढ, नवीन अभ्यासक्रम, सेकंड शिफ्टबाबतचे प्रस्ताव या संचालनालयास/ अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना ऑनलाईन सादर (Confirm) केलेले आहेत, त्यापैकी शासकीय संस्था, तसेच दिनांक २८.२.२०१४ किंवा दिनांक ५.३.२०१४ रोजी सुनावणीस हजर असलेल्या संस्था वगळून उर्वरित संस्थापैकी तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/ मुंबई/ या विभागाअंतर्गत येणा-या संस्थांची सुनावणी दि. २०.३.२०१४ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० या दरम्यान घेण्यात येणार आहे. तसेच, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक/ पुणे या विभागाअंतर्गत येणा-या संस्थाची सुनावणी दि. २०.३.२०१४ रोजी दुपारी २.०० ते सांय ५.३० या दरम्यान घेण्यात येणार आहे. तरी संबंधीत संस्थांनी नमूद कागदपत्रांसह सुनावणीकरिता संस्थेचे सचिव/अध्यक्ष/प्राचार्यांनी यापैकी एक यांनी व्यक्तीशः या संचालनालयात उपस्थित रहावे ही बाब आपल्या अखत्यारीतील उपरोक्त विषयाबाबत ऑनलाईन प्रस्ताव सादर केलेल्या सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

१. संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयात नोंदणी शुल्क रक्कम भरल्याची पावती.
२. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई / तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे प्राचार्य/शिक्षकीय पदांना मान्यतेबाबतचे पत्र/ संबंधीत कागदपत्र.

\\DTENS1\desk10\DINESH\Prastav 2014-15\office order 2014-15.doc
9 -

३. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचा त्रुटी अहवाल(Deficiency Report)/ त्रुटी पुर्तता अहवाल(Compliance Report).
४. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना सादर केलेल्या अर्जाची प्रत व कागदपत्र.(अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत)
   अ. भाग-१ (Part I).
   ब. भाग-२ (Part II).
५. मागील ३ वर्षाच्या प्रवेशाच्या रिक्त जागांबाबत तक्ता.
६. संस्थेच्या प्राचार्यांनी साक्षांकित केलेले **प्रपत्र क व ड** (Annexure C & D).
७. नोंदणीकृत आर्किटेक्ट यांनी प्रमाणित केलेले **प्रपत्र इ** (Annexure E).
८. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचा मागील शैक्षणिक वर्षाचा सम सत्रातील ॲकेडमीक मॉनेटरींग रिपोर्ट.
९. प्रस्तावित नवीन अभ्यासक्रम/ प्रवेशक्षमता वाढ याअनुषंगाने संस्थेकडे असलेल्या आर्थिक तरतुदीबाबत कागदपत्र (बँकचे विवरणपत्र, मुदतठेवी, बचत खाते इ.)
१०. कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वेतनाबाबत बँकेचे विवरणपत्र.
११. तसेच प्रस्तावात नमूद माहितीच्या अनुषंगाने संबंधीत इतर कागदपत्रे.

तसेच पुढे असेही नमूद करण्यात येते की, दिनांक २०.३.२०१४ नंतर या संचालनालयामार्फत सुनावणी आयोजित करण्यात येणार नाही याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील ही बाब संबंधीत संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक,

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर यांचे कार्यालय
क्र.तंशिसं/प्राकाना/शैवि २/पदविका/२०१४/889
दि. 18 MAR 2014

प्रति,
या विभागातील संस्थांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता. वरिल पत्रात नमूद केल्याप्रमाणे सदर सुनावणी करिता सर्व कागदपत्रासह दिलेल्या वेळेत हजर राहावे.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.